# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७ / फाल्गुन १९, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | आदिवासी विकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उद्योग व खनिकर्म मंत्री | |
| (३) | ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री | |
| (४) | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री | |
| (५) | सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४२**

---

**मुंबई विद्यापीठातील वसतिगृह बांधकामासाठीचा रु. १ कोटी ८० लाखांचा निधी विनावापर पडून असल्याबाबत**

**(१) * ७३८११ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून मुंबई विद्यापीठात चार वसतिगृहे उभारण्यासाठी प्राप्त झालेला रु.१ कोटी ८० लाखांचा निधी मागील वर्षापासून विनावापर पडून असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन कुलगुरू श्री. राजन वेळूकर यांच्या हस्ते मुंबई विद्यापीठाच्या कालिना परिसरात दोन व ठाणे परिसरात दोन वसतिगृहाच्या बांधकामाचे भूमिपूजन होऊन देखील अद्याप काम सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतिगृहाचे काम सुरु न करण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वसतिगृहे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे. तत्कालीन कुलगुरु श्री.राजन वेळूकर यांच्या हस्ते कालिना परिसरातील वसतिगृहाचे भूमिपूजन करण्यात आले. तथापि, ठाणे परिसरातील वसतीगृहाचे भूमिपूजन करण्यात आले नाही.

(३) वास्तुविशारदाने महापालिकेकडून बांधकाम परवानगी न आणल्याने काम सुरु करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सदरील वसतिगृहाचे बांधकाम करण्यासाठी महापालिकेकडून परवानगी आणावयाचे काम वास्तुविशारदाकडे आहे. तथापि, संबंधित वास्तुविशारदाने बांधकाम परवानगी न आणल्याने काम सुरु करण्यात आलेले नाही.

-----------------

## देवरी तालुक्यातील (जि.गोंदिया) स्वामी राधाकृष्ण आदिवासी आश्रमशाळेत एका विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू

**(२) * ७५७०५ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी तालुक्यातील (जि.गोंदिया) स्वामी राधाकृष्ण आदिवासी आश्रमशाळेत एका विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चार वर्षांपूर्वी याच आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याने या आश्रमशाळेची मान्यता शासनाने रद्द केली होती तथापि, कालांतराने सदर आश्रमशाळेस पुनर्मान्यता देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) तद्नुसार सदरहू आश्रमशाळेतील अधिक्षक, मुख्याध्यापकांची चौकशी करुन त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दि. १२ जुलै, २०१२ रोजी सर्पदंशाने दोन विद्यार्थांचा मृत्यु झाला होता. या प्रकरणी चौकशी करुन चौकशी अहवालातील शिफारशीनुसार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दि. ६ जुलै, २०१३ अन्वये आश्रमशाळेची मान्यता रद्द केली होती. या आदेशाविरुद्ध संस्थेने दाखल केलेल्या रिट याचिकेतील उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सुनावणी घेण्यात आली. संस्थेने आवश्यक सुधारणा केलेल्या असल्याने तसेच अशा प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये अशी सक्त ताकीद देवून आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे दिनांक ६ जुलै, २०१३ चे आदेश रद्द करुन शासन निर्णय दिनांक २६ मे, २०१४ अन्वये शाळेस पुनर्मान्यता देण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्नातील भाग २ ला अनुसरुन या प्रकरणी श्री. एम.एम.बारस्कर, अधिक्षक व रात्रपाळीवर असलेले श्री. एच.एस.कोरे, कामाठी यांना निलंबित करण्यात आले होते.

प्रश्नातील भाग १ बाबत प्रकल्प कार्यालय, देवरी कडून चौकशी करण्यात आली असून दिनांक २२.२.२०१७ च्या आदेशान्वये श्री. पी.एल. उखरे, प्राथमिक मुख्याध्यापक, श्री. डी.एस. रहांगडाले, वर्गशिक्षक, तसेच श्रीमती लता लांजेवार, माध्यमिक शिक्षिका व प्रभारी अधिक्षिका यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्यात आली आहे. तसेच श्री. बारस्कर, अधिक्षक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्याबाबत संस्थेला सुचना दिलेल्या आहेत. प्रकल्प अधिकारी यांनी शाळेची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याची शिफारस दिनांक २६.२.२०१७ च्या पत्रान्वये केली आहे. त्या अनुषंगाने दिनांक ४.३.२०१७ च्या आदेशान्वये शाळेची कायमस्वरुपी मान्यता रद्द करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगेवाडी (जि.बीड) येथील सिंदफणा प्राथमिक आश्रमशाळेतील शिक्षक मुलींशी गैरवर्तन करित असल्याबाबत

**(३) * ७३८८६ श्री.नितेश राणे (कणकवली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगेवाडी (जि.बीड) येथील सिंदफणा प्राथमिक मुलींच्या आश्रमशाळेच्या वसतिगृहात मुख्याध्यापक तसेच अधिक्षक या पदांवर स्त्री शिक्षक नसल्याने कार्यरत असलेले पुरुष शिक्षक वसतिगृहात रात्रीच्या वेळी मुलींचा लैंगिक छळ करीत असल्याबाबतच्या तक्रारी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान “लेक लाडकी अभियान” च्या कार्यकर्त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी देवराव नाथा म्हसके या शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असतानाही आजमितीस अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या मुलांमुलींसाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या आश्रमशाळांसाठी सुधारित नियमावली जाहिर करणारा शासन निर्णय दिनांक ३ जून, १९९९ रोजी निर्गमित करण्यात आला असून सदरहू शासकीय निर्णयानुसार आश्रमशाळेतील मुख्याध्यापक तसेच अधिक्षक या पदांवर महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे अनिवार्य आहे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना महिला उमेदवारांना प्राधान्य देणे अनिवार्य असतानाही सिंदफणा आश्रमशाळेत या नियमाचे उल्लंघन झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संपूर्ण बीड जिल्हयात ४६ आश्रमशाळा असून त्यातील ४ आश्रमशाळा उसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी असून यातील एकाही शाळेत महिला अधिक्षक आणि मुख्याध्यापक नेमण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, सदर चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) नाही, संबंधित शिक्षकास दि. १८.१.२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे.

(३) शासन निर्णय दि. ३ जून, १९९९ मध्ये केलेल्या सुधारीत नियमावलीस स्थगिती दिली आहे.

(४) बीड जिल्हयातील एकूण ४६ आश्रमशाळांपैकी १० आश्रमशाळांमध्ये महिला अधिक्षक पदे मंजूर असून सदरची पदे भरण्यात आली आहेत.

तसेच २ प्राथमिक आश्रमशाळांमध्ये व २ माध्यमिक शाळांमध्ये महिला मुख्याध्यापिका कार्यरत आहेत.

(५) सदर आश्रमशाळेतील संबंधित सहशिक्षक श्री.डी.एन.मस्के यांना निलंबीत करुन त्यांचेविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद केला आहे. तसेच सहशिक्षक श्री उनवणे के.व्ही व श्री. ए.एल.काटे या दोन्ही कर्मचा-यांची तीन वर्षाकरिता वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

प्रवेशित मुलींच्या संरक्षणाच्यादृष्टीने खाजगी महिलेची मानधनावर संस्थेमार्फत नियुक्ती केलेली आहे. तसेच चौकशी समिती गठीत करण्यात आली असून समितीमार्फत चौकशीचे कामकाज चालू आहे.

तसेच संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण पुणे यांनी सुनावणीअंती सदर आश्रमशाळेची मान्यता रद्द केली आहे.

-----------------

**खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) डोलवली आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनीचा झालेला मृत्यु**

**(४) * ७४०८५ श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन),**

**श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत-खालापूर तालुक्यात (जि.रायगड) डोलवली शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील ११ वर्षीय कु. यमुना खडके या मुलीचा किरकोळ आजारात झोपेतच दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले असून या मुलीच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या अधीक्षक व वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खालापूर यांच्याविरुध्द तातडीने कारवाई करण्याबाबत दिशा संस्थेचे अध्यक्ष यांनी आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आश्रमशाळा जबाबदार असल्याचा आरोप मुलीच्या कुटुंबियांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच कर्जत-खालापूर तालुक्यात आदिवासी विकास विभागाच्या एकूण ८ शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत स्त्री अधिक्षिकेचे पद रिक्त असल्याने आश्रमशाळेतील विद्यार्थीनीना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून याबाबत अनेकवेळा मागणी करण्यात येऊनही रिक्त पदे भरण्याबाबत अप्पर आयुक्त, ठाणे व प्रकल्प अधिकारी, पेण यांच्याकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार उक्त आश्रमशाळेतील मुलीच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच स्त्री अधिक्षिकेचे पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) कु. यमुना वासुदेव खडके, इ. ६ वी हिचा दि.१३.१.२०१७ रोजी पहाटे डोलवली शासकीय आश्रमशाळेत मृत्यु झाला असून शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला नसल्याने मृत्युचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणी दिशा संस्थेचे अध्यक्षांचे कुठलेही निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही. परंतु, मा. श्री. मनोहर भोईर, विधानसभा सदस्य, यांनी दि.१९.१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रकरणी चौकशी करण्याची व मृत विद्यार्थीनीच्या पालकास आर्थिक सहाय देण्याबाबत विनंती केली आहे.

प्रकरणी कु. यमुना वासुदेव खडके, या विद्यार्थीनीला तिच्या मृत्युपूर्वी दि.९.१.२०१७ व दि.१२.१.२०१७ रोजी शासकीय आश्रमशाळा डोलवली येथील कर्मचाऱ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, खालापुर, जि. रायगड येथे उपचारार्थ नेलेले होते. तथापि, तिच्या मृत्युबाबत शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला नसल्याने मृत्युचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे प्रकरणी शवविच्छेदन अहवाल प्राप्त करून घेवून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर मयत विद्यार्थीनीच्या पालकांना रू.७५,०००/- सानुग्रह अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

खालापुर तालुक्यातील ६ शासकीय व १ अनुदानित अशा एकूण ७ आश्रमशाळा असून सदर शाळांसाठी स्त्री अधीक्षिकेची ७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४ शासकीय आश्रमशाळेतील स्त्री अधीक्षिकेच पद रिक्त असून सदर पदाचा प्रभार शाळेतील जेष्ठ शिक्षिका यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. नोकर भरतीवरील बंधन शिथिल करून अधिक्षक व गृहपाल यांची ८० % मर्यादेत पदे भरण्यास शासनाने दि.१७.१२.२०१६ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार भरती प्रक्रिया सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्याबाबत**

**(५) * ७३९०७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर),**

**ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११ वी, १२ वी आणि १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या परंतु कोणत्याही शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच सदर योजनेची अंमलबजावणी कोणत्या आर्थिक वर्षापासून करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदर योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाचा लाभ किती मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणार आहे व त्यानुषंगाने अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय. हे खरे आहे.

(२) अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश मिळालेला नाही, अशा विदयार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विदयार्थ्यांना स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबधित विदयार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट उपलब्ध करण्यासाठी शासनाने "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना" ही योजना सुरू केलेली आहे.

(३) सदर योजनेची अंमलबजावणी २०१६-२०१७ या आर्थिक वर्षांपासून करण्यात येणार आहे

(४) सन २०१६-१७ या वर्षात अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाच्या १५००० विद्यार्थ्यांना आणि सन २०१७-१८ पासून २५००० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पतसंस्था नियामक मंडळ स्थापन करण्याबाबत

**(६) * ७४१३९ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अनिल बाबर (खानापूर),**

**डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७२ हजार सहकारी संस्थांची नोंदणी राज्यशासनाने रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती सहकार परिषदेच्या अध्यक्षांनी दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामधील २ लाख ३८ हजार सहकारी संस्था सहकार खात्याकडे नोंदणीकृत असून यामधील मजूर संस्था, गृहनिर्माण संस्था तसेच मोठ्या पतसंस्था बोगस असल्याचे सहकार विभागाच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी बँकांप्रमाणेच पतसंस्थांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळ स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून या निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, पतसंस्थांच्या फेडरेशनने पतसंस्था नियामक मंडळ स्थापन करण्याच्या निर्णयास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नियामक मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) पतसंस्थांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळ स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये घेतला असून, प्रस्तावित पतसंस्था नियामक मंडळ, हे अध्यक्ष व इतर ८ सदस्यांचे मिळून असेल. निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे हे नियामक मंडळाचे अध्यक्ष असतील, या मंडळात अपर निबंधक, सहकारी संस्था, सहकारी बँकेतील निवृत्त अधिकारी, सनदी लेखापाल, पतसंस्थांचे प्रतिनिधी इत्यादींचा समावेश असेल.

(४) पतसंस्था नियामक मंडळाच्या स्थापनेस पतसंस्था फेडरेशनने विरोध केल्याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील बियर बार व दारुची दुकाने हटविण्याबाबत**

**(७) * ७३९१५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील अपघातांना प्रतिबंध घालण्याकरीता सदर महामार्गावर ५०० मीटर अंतराच्या आत दारुच्या दुकानांना बंदी घालण्याचे आदेश माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवडयात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतरही त्यानुषंगाने विभागाने अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच दिनांक ०१ मे, २०१७ पासून राज्य शासनाने महामार्गालगत ५०० मीटर प्रतिबंधीत क्षेत्रात नव्या बियर बार तथा मद्य विक्री दुकानास परवानगी देवू नये असेही आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ मधील ५०० मी. चे महामार्गापासूनचे अंतर कोणत्या पद्धतीने निश्चित करण्यात येणार आहे व त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची मदत घेण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावरील, तेरा हजार बियर बारचे परवाने रद्द होणार असल्याने, सदरहू दुकाने त्वरित हटविण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

तामिळनाडू राज्य विरुध्द के. बालू व इतर या सिव्हील अपील क्र. १२१६४-१२१६६ सन २०१६ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १५.१२.२०१६ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार राज्यात करावयाच्या कार्यवाहीची रुपरेषा

ठरविण्यासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि. २७.१.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महामार्गापासून अनुज्ञप्तींचे महामार्गापासूनच्या अंतराचे मोजमाप करुन ५०० मिटरच्या आत असलेल्या अनुज्ञप्तींची माहिती संकलीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. ३१ मार्च, २०१७ नंतर महामार्गापासून ५०० मिटर परिसरात मद्य विक्रीची अनुज्ञप्ती देवू नये असे निर्देश दिले आहेत.

(३) महामार्गापासून ५०० मिटरच्या आत असलेल्या अनुज्ञप्तींचे अंतर निश्चितीबाबतची कार्यवाही प्रचलित तरतूदीनुसार तसेच अंतर निश्चित करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग व अन्य प्राधिकरणाची मदत घेण्यात येत आहे.

(४) मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १५.१२.२०१६ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने सर्व पैलुंचा विचार करुन राज्यात करावयाच्या कार्यवाहीची रुपरेषा ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मोहोळ (जि.सोलापूर) येथील वीज वितरण कार्यालयातील उपकार्यकारी अभियंता यांनी आत्महत्या केली असल्याबाबत**

**(८) * ७४३६६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ (जि.सोलापूर) येथील वीज वितरण कार्यालयातील उपकार्यकारी अभियंता विकास पानसरे यांनी वरिष्ठ अधिका-यांच्या मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित वरिष्ठ अधिका-यांवर कारवाई करण्यासाठी महावितरण कंपनीच्या वीज कामगार अधिकारी अभियंता संयुक्त कृती समितीने या सुमारास सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढुन निदर्शने केली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या घटनेबाबत नाशिक जिल्हयातील सबॉर्डिनेट इंजिनीअर्स असोसिएशने विद्युत भवन येथे द्वारसभा घेऊन महावितरण कंपनीत अभियंत्यांवर मानसिक ताण वाढत असल्याचे निदर्शनास आणून राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत येथील लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा.ऊर्जा मंत्री यांना निवेदन दिले असून शासनाने उक्त आत्महत्या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) श्री. पानसरे यांच्या मृत्यूबाबत पोलीसांमार्फत तपास सुरु आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी महावितरण कंपनीने चौकशी समिती नेमली होती. सदर समितीच्या अहवालाच्या प्राथमिक निष्कर्षावरुन दोषी कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई कंपनीने सुरु केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### बोरगाव बाजार (ता. सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील ३३ केव्ही वीज उपकेंद्राच्या उभारणीचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(९) * ७९४६१ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड तालुक्यातील (जि.औरंगाबाद) बोरगाव बाजार येथील ३३ केव्ही वीज उपकेंद्राच्या उभारणीसाठी ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करुन दिलेली असतानाही दोन वर्षांचा कालावधी उलटूनही या उपकेंद्राच्या उभारणीचे काम अपूर्ण स्थितीत असल्याने परिसरातील गावात विजेची समस्या कायम असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या गावातील विजेची समस्या सोडविण्यासाठी सदर वीज उपकेंद्राचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) बोरगांव वीज उपकेंद्राकरिता ग्रामपंचायत मालकीची जागा गट क्र. ८० दि. २०.११.२०१४ रोजी कंत्राटदार मे. दामोदर टेक इंटरनॅशनल प्रा. लि. सह मे. बी. व्ही. जी. इंडिया यांना हस्तांतरित करण्यात आली आहे. सदर कंत्राटदाराने उपकेंद्रासाठी प्रत्यक्ष खोदकाम सुरु केले असता, त्या जागेतून गेलेल्या पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनमुळे ग्रामपंचायत व ग्रामस्थ, बोरगाव बाजार यांनी दि. १३.०६.२०१५ रोजी अडथळा निर्माण केला व काम थांबविण्यास सांगितले. महावितरण, ग्रामपंचायत, बोरगाव बाजार व कंत्राटदार यांच्या समन्वयाने उपरोक्त अडथळा दूर करण्यात आला व पाईपलाइन स्थलांतरित करुन उपकेंद्राचे काम सुरु करण्यात आले आहे. सदर उपकेंद्राच्या कामाला अपेक्षित गती प्राप्त न झाल्यामुळे महावितरण कंपनीकडून वेळोवेळी कंत्राटदारासोबत बैठका घेवून व लिखित सूचना देवून सदर उपकेंद्राचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदरचे काम मार्च, २०१७ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तिवसा, अमरावती, भातकुली व मोर्शी (जि.अमरावती) या तालुक्यातील ग्रामीण भाग दीनदयाल उपाध्याय ग्राम योजना व इन्फ्रा ३ मध्ये समाविष्ट करण्याबाबत

**(१०) * ७७०२७ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा, अमरावती, भातकुली व मोर्शी (जि.अमरावती) या तालुक्यातील ग्रामीण भाग पं. दीनदयाल उपाध्याय ग्राम योजना व इन्फ्रा ३ मध्ये समाविष्ट करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक २७ मे, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तिवसा तालुक्यातील (जि.अमरावती) ग्रामीण भागात कृषी पंप व वीज जोडणी करिता कंत्राटदारांकडून उभारण्यात आलेले विद्युत खांबाची जमिनीत कमी खोलीवर उभारणी करण्यात आल्यामुळे व सदर विद्युत खांब निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे गारपीट, वादळी पाऊस व इतर कारणास्तव वाकलेले असून त्यामुळे जिवितहानी होऊ शकते व वारंवार वीज पुरवठा खंडीत होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन चांगल्या दर्जाचे विद्युत खांब बसविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांना दिनांक १९ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग १ व ३ बाबतच्या निवेदनाची दखल घेत सदर तालुक्यातील ग्रामीण भागात उक्त सुविधा पुरवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) तिवसा तालुक्यामध्ये मे, २०१६ मध्ये झालेल्या वादळी पाऊस व गारपीटीमुळे वाकलेल्या व तुटलेल्या विद्युत खांबांच्या दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर करुन ते दुरुस्त करण्यात आले आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) प्रश्न भाग १ व ३ मध्ये नमूद निवेदना अंतर्गत मागणी केलेल्या ३३ के.व्ही. नवीन उपकेंद्रापैकी शेंदुरजना माहुरे ता. तिवसा व तळेगाव (ब्राम्हणवाडा, मोर्शी) येथे दिनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत नवीन ३३ /११ केव्ही उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले असून निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. ३३ के.व्ही. लालखेडी ते वलगाव वाहिनीचे काम इन्फ्रा २ योजनेअंतर्गत मंजूर असून काम प्रगतीपथावर आहे. सदर वाहिनीचे काम दि. ३१ मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अमरावती, भातकुली, मोर्शी व तिवसा तालुक्याअंतर्गत निवेदनातील नमूद असलेल्या सर्व गावांमध्ये नवीन वितरण रोहित्र पायाभूत आराखडा-२, कृषी पंप उर्जीकरण व दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

कृषीपंपाकरीता असलेल्या वाहिनीवर सिंगल फेज वीजपुरवठा देण्याकरीता लागणाऱ्या कामाचे जिल्हा नियोजन योजनेमध्ये अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले असून प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना दि. १६.०१.२०१७ व दि. १८.०२.२०१७ रोजी महावितरणकडून सादर करण्यात आले आहे.

विदर्भ मराठवाडा कृषीपंप विद्युत पायाभूत सुविधा योजने अंतर्गत अमरावती जिल्हयास रु. ९८ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून त्यात ११०४४ कृषीपंप ऊर्जीकरणाची तरतूद होती. सदर योजनेअंतर्गत जानेवारी, २०१७ पर्यंत ९६५७ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून ८३२ नवीन रोहित्रे उभारण्यात आले आहे व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, विदर्भ मराठवाडा कृषीपंप विद्युत पायाभुत सुविधा योजने अंतर्गत अमरावती जिल्हयास रु. १३५.५९ कोटी इतका निधी मंजूर असून सदर योजनेअंतर्गत निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे व सदर योजनेअंतर्गत ८१६ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

तिवसा तालुक्यामध्ये मे, २०१६ मध्ये झालेल्या वादळी पाऊस व गारपीटीमुळे वाकलेल्या व तुटलेल्या विद्युत खांबांच्या दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर करुन ते दुरुस्त करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजपूर (गाडेवाडी) (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे साहित्य पुरविण्यात येत असल्याबाबत**

**(११) * ७६९०० श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव तालुक्यातील (जि.पुणे) राजपूर (गाडेवाडी) येथील आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांकरिता ठेकेदाराकडून पुरविण्यात येणारे धान्य, भाजीपाला, फळे, गणवेश, स्वेटर, बूट अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतची तक्रार शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांनी स्थानिक प्रकल्प अधिकारी, पुणे यांच्याकडे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त असुविधांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी मा. आदिवासी विकास मंत्र्यांकडे देखील निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) या बाबत विधान सभा सदस्य मा.श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी मां.मंत्री, आदिवासी विकास यांना सादर केलेले निवेदन विभागाकडे प्राप्त झाले असुन त्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कडुन शासन पत्र दि.०७.०२.२०१७ अन्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, घोडेगाव यांनी शाळांची तपासणी करून दि. ०३.०३.२०१७ रोजी तपासणी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार प्रकल्प अधिकारी यांनी गोहे, तेरूंगण व राजपूर येथील आश्रमशाळांची तपासणी केली असता विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या साहित्याचा पुरवठा चांगला असल्याचे आढळून आले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हट्टा (ता.वसमत,जि.हिंगोली) व केसापूर (ता.जि.हिंगोली) या परिसरातील शेतक-यांना कृषी पंपासाठी विद्युत जोडणी देण्याबाबत**

**(१२) * ७७१०२ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हट्टा (ता.वसमत,जि.हिंगोली) या परिसरातील चिखली ब्राम्हणगाव आदी गावातील शेतक-यांनी कृषी पंपासाठी सन २०१४-१५ मध्ये वीज मंडळाकडे कोटेशन भरुनही त्यांना विद्युत जोडणी देण्यात आली नसल्यामुळे शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच केसापूर (ता.जि.हिंगोली) या गावातील विद्युत तारा अतिशय जीर्ण झालेल्या असल्यामुळे गावात वारंवार वीज पुरवठा खंडीत होतो तसेच या जीर्ण विद्युत तारांमुळे केव्हाही अपघात होऊन जिवितहानी होण्याचा धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गावांतील शेतक-यांना विद्युत जोडणी देण्याबाबत व जीर्ण झालेल्या विद्युत तारा बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबत विलंब व दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजे चिखली गावात पैसे भरुन कृषीपंप वीज जोडणीच्या प्रतिक्षेत एकही ग्राहक नाही. मौजे ब्राम्हणगाव या गावातील प्रलंबित दोन ग्राहकांना कृषीपंप वीज जोडणी दिली आहे.

(२) हे खरे नाही.

जीर्ण झालेल्या लघुदाब वाहिनीच्या विद्युत तारा डीपीडीसी योजनेअंतर्गत दि. २५/०१/२०१७ रोजी बदलण्यात आल्या आहेत. त्यामुळे जिवीतहानी होण्याचा धोका संभवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महावितरणने कृषि पंपाच्या वीज दरवाढीचा घेतलेला निर्णय

**(१३) * ७४८२८ श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीने कृषि पंपाची वीज दरवाढ करण्याचा निर्णय घेतला असून आयोगाने लागू केलेल्या दरवाढीची संपुर्ण रक्कम शेतकरी वीज ग्राहकांना भरावी लागेल असे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या परिपत्रकात नमुद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २०१६ पासून शेतीपंप वीज ग्राहकांसाठी जाहीर केलेली दरवाढ किमान ४० ते कमाल ९० टक्के करण्यात आली आहे व दरवर्षी टप्प्याटप्प्याने आणखी वाढ होणार असून  माहे एप्रिल, २०१९ पर्यंत उक्त दर आजच्या तुलनेत दोन ते अडीचपट होणार आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याचा विरोध करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य वीजग्राहक संघटनेच्या अध्यक्षांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील  गत तीन वर्षातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता सदर दरवाढीचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) वीज दर ठरविण्याचे अधिकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास आहेत आयोगाने दि. ३/११/२०१६ च्या वीज दर आदेशान्वये दि. १/११/२०१६ पासून नवीन वीज दर लागू केले आहेत त्यानुसार महावितरणने परिपत्रक निर्गमित केले आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१५ च्या वीजदराच्या तुलनेत नवीन वीज दर वाढीची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| विना मीटर ग्राहक | - २३.६८ % ते ५०.३६ % |
| मीटर असलेले ग्राहक | - ४२.३ % ते ६५.४५ % |

तसेच वित्तीय वर्ष २०१७ - १८, २०१८ - १९ व २०१९ - २० या वर्षाकरिता विनामीटर ग्राहकांकरिता अनुक्रमे १०.९२ %, १६.८०% आणि २२.१२ % तसेच मीटर ग्राहकांकरिता अनुक्रमे ७.८९ %, ११.५१ % आणि १६.११ % एवढी वीजदरवाढ आहे..

(३) हे खरे आहे.

(४) विहित प्रक्रिये नुसार सर्व संबंधितांचे म्हणणे विचारात घेऊन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सदरचे नवीन वीज दर निश्चित केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मद्य व मद्यार्काची अवैध वाहतूक थांबविण्यासाठी 'ट्रॅक अँड ट्रेस' प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत

**(१४) * ७५०४९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या उत्पादन शुल्क विभागांतर्गत मिळणाऱ्या महसुलामध्ये वाढ होण्याकरिता व देशी विदेशी मद्य व मद्यार्काच्या अवैधपणे होत असलेल्या तस्करीला आळा घालण्याकरिता मद्य व मद्यार्क वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस बसवून 'ट्रॅक अँड ट्रेस' हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातून मद्य व मद्यार्क वाहतूक करणाऱ्या वाहनांची इत्यंभूत माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कंट्रोल रूममध्ये उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे नेमके स्वरूप काय असणार आहे, सदरचा प्रकल्प केव्हापर्यंत अस्तित्वात येणार आहे व तो राबविण्यासाठी किती खर्च येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) अवैध मद्य, मद्य व मद्यार्काची अवैध विक्री इत्यादी कारणांमुळे शासनास उत्पादन शुल्कापासून मिळणाऱ्या महसूलाची गळती थांबवून महसूल वाढीसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने ट्रॅक ॲन्ड ट्रेस प्रणाली विकसीत करणे, संगणक प्रणाली विकसीत करण्याकरिता शासन निर्णय दि. २१.१.२०१७ अन्वये आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे. सदरहू प्रकरणी समितीमार्फत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील विद्‌युत मंडळाच्या गैरकारभाराबाबत**

**(१५) * ७५५८१ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर तालुक्यातील (जि. बुलढाणा) शेतक-यांचे ऐन रब्बीच्या हंगामात आलेले पिक खंडित वीज पुरवठयामुळे धोक्यात आले असून वीज वितरण कंपनीच्या बेजबाबदार कारभारामुळे शेतक-यांचे नुकसान होत असल्याने वीज पुरवठा सुरळीत करावा या मागणीकरिता माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान राजकीय पक्षाच्या पदाधिकारी व ग्रामस्थांनी विज कंपनीच्या अधिका-यांना घेराव घातला, हे खरे आहे काय,

(२) तसेच मेहकर तालुक्यात (जि.बुलढाणा) ग्रामीण भागात विजेच्या खांबावर रानवेलीचे अतिक्रमण, विद्‌युत तारा वादळात तुटून शेतक-यांचे मोटारपंप जळणे, तीन पैकी एका फेजवर कमी वोल्टेज असल्याने घरातील विद्‌युत उपकरणे बिघडणे, कित्येक ठिकाणी गावठाण डिपीला दरवाजे नसणे अशा प्रकारच्या तक्रारी आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या बेजबाबदार कारभारामुळे दुर्घटना होण्याची शक्यता असल्याने या सर्व बाबीसंदर्भात ग्रामस्थांनी वारंवार वीज वितरण कंपनीकडे तक्रार करुनही अद्‌यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन याची पाहणी करून चौकशी करणार आहे काय, तसेच प्रश्न भाग १ व २ नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) ता. मेहकर जि. बुलढाणा अंतर्गत १३९ गावांमधील विद्‌युत ग्राहकांसाठी अखंडीत व सुरळीत वीजपुरवठा करण्याकरिता महावितरण कंपनीतर्फे वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये विविध योजना राबविल्या असून विद्‌युत प्रणालीचे सक्षमीकरण खालील प्रमाणे आहे.

पायाभुत आराखडा योजना-२ अंतर्गत कळंबेश्वर, पिंपळगाव उंडा, भालेगाव पाचला या गावांकरीता ५ एमव्हीए क्षमतेची ३ उपकेंद्रे उभारण्यात आली आहे १०० नवीन रोहित्रे, ८० रोहित्रांची क्षमतावाढ ४१ किमी उच्चदाब वाहिनी, ५३ किमी लघुदाब वाहिनी उभारण्यात आली आहे.

विदर्भ मराठवाडा स्पेशल पॅकेज योजनेअंतर्गत २७ नवीन रोहित्रे, उच्च दाब वाहिनी १५.५० किमी तसेच लघुदाब वाहिनी १७७.२१ ची उभारणी करण्यात आली आहे.

मेहकर उपविभागा अंतर्गत येत असलेल्या मेहकर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्युतीय व विज वितरण कंपनीशी संबधित तक्रारीचा आढावा घेणेकरिता वेळोवेळी मा. लोकप्रतिनीधींशी चर्चा करण्यात येते. मेहकर उपविभागातील विद्युत प्रणालीच्या देखभाल दुरुस्तीसाठी रु. ५ लक्ष एवढया रक्कमेच्या ई निविदा प्रक्रियेव्दारे शासकीय मान्यता प्राप्त एजन्सी/कंत्राटदारा मार्फत देखभाल दुरुस्तीची अत्यावश्यक कामे करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. दुर्घटना प्रवण ठिकाणांचा उपविभागीय स्तरावर वारंवार आढावा घेण्यात येऊन तात्काळ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात येतात.

-----------------

## पुणे जिल्हयातील घोडेगांव आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प अधिकारी व गृहपाल यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१६) * ७९७२३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील घोडेगांव आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील श्री. सोनकवडे, प्रकल्प अधिकारी व श्री. गायकवाड, गृहपाल, मांजरी फार्म, पुणे यांनी शासकीय अनुदानित आश्रमशाळा चावंड व तळेरान येथील प्रशिक्षक व अधिक्षक भरतीमध्ये बिगर आदिवासी व इतर जिल्हयातील उमेदवारांची भरती करुन कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतच्या तक्रारी आदिवासी आदिम कातकरी संघटना यांनी आदिवासी विकास मंत्री व सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भरती प्रक्रियेस मा. उच्च न्यायालय यांनी स्थगिती दिली असतानाही श्री. सोनकवडे, प्रकल्प अधिकारी, घोडेगांव यांनी स्वत:च्या अधिकारात भरती प्रक्रिया राबविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार न्यायालयाचा अवमान करुन मोठया प्रमाणावर भरती प्रक्रिया राबविणाऱ्या प्रकल्प अधिकारी, घोडेगांव व गृहपाल, मांजरी फार्म, पुणे यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी आदिम कातकरी संघटनेने मा.मंत्री,आदिवासी विकास यांना निवेदन सादर केले असून प्रस्तुत निवेदन नियमोचित कार्यवाहीसाठी आयुक्त,आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडे पाठविण्यात आले आहे.

प्रस्तुत निवेदनातील भरतीबाबतचा विषय अनुदानित आश्रमशाळेशी संबंधित आहे. अनुदानित आश्रमशाळेतील भरती ही संबंधित संस्थेद्वारे केली जाते.
(२) अधिक्षक (महिला/पुरूष) संवर्गातील पदभरतीस मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही.

मा.राज्यपाल महोदयांचे दि.०९ जून, २०१४ च्या अध्यादेशाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.८७८३/२०१४ प्रकरणी अपर आयुक्त, ठाणे यांच्या अधिनस्त अनुसूचित क्षेत्रातील शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक संवर्ग व प्रकल्प कार्यालयातील आदिवासी विकास निरीक्षक संवर्गातील पद भरतीस अंतिम आदेश होईपर्यंत अंतरिम स्थगिती देण्यात आली आहे.

त्यामुळे, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचेमार्फत शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक संवर्गाची भरती करण्यात आलेली नाही.
(३) आदिवासी आदिम कातकरी संघटनेने सादर केलेल्या तक्रारीबाबतचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर, त्यावर नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांतील व वसतिगृहातील गृहपालांसह महिला अधिक्षकांची पदे भरण्याबाबत

**(१७) * ७५१३८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रकाश**

**फातर्पेकर (चेंबूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १०७५ आश्रमशाळा असून त्यापैकी मुलींच्या आश्रमशाळा व वसतिगृहात मुलींच्या सुरक्षेसाठी महिला अधिक्षक नियुक्त करण्याचा निर्णय दहा वर्षांपूवी घेण्यात आला मात्र या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी झाली नसून राज्यातील ५२५ मुलींच्या आश्रमशाळांत अद्यापही महिला अधिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहांमधील गृहपालांसह अधिक्षकांची ३२५ पदे भरण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे डिसेंबर,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात शासकीय आश्रमशाळांसाठी ७६१ कोटी रुपये आणि खाजगी आश्रमशाळांसाठी ५२६ कोटी रुपये अशी १२८७ कोटी रुपयांची तरतूद केली असून मुलींच्या सुरक्षिततेसाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(४) तसेच प्रश्न भाग १ व २ मधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त ४९१ शासकीय वसतीगृहे आणि ५५२ शासकीय व ५५६ अनुदानित अशा एकूण ११०८ आश्रमशाळा कार्यरत आहेत.

शासकीय आश्रमशाळेमध्ये महिला अधिक्षकांची ५५१ पदे मंजूर असून त्यापैकी २६० पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत.

अनुदानित आश्रमशाळेमध्ये महिला अधिक्षकांची ५४७ पदे मंजूर असून त्यापैकी १५३ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत.

(२) व (३) शासकीय वसतीगृहांमधील गृहपाल (पुरुष/महिला) संवर्गातील सद्य:स्थितीत रिक्त असलेल्या पदांपैकी ४५ पदे व शासकीय आश्रमशाळांमधील अधिक्षक (पुरुष/महिला) या संवर्गातील रिक्त पदांपैकी २८० पदे सरळसेवेने भरण्याकरीता आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

शासकीय वसतीगृहांमधील गृहपाल (पुरुष/महिला) आणि शासकीय आश्रमशाळां-मधील अधिक्षक (पुरुष/महिला) या पदांची भरती करण्याकरीता नियुक्ती प्राधिकारी अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

अनुदानित आश्रमशाळेतील अधिक्षकांची पदे भरण्याकरीता नियुक्ती प्राधिकारी संबंधित संस्था असून, सदर पदे तातडीने भरण्याबाबत संबंधिताना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी तालुक्यातील झरी व आसेगाव परिसरात सलग १६ ते १८ तास भारनियमन केले जात असल्याबाबत

**(१८) * ७९२८७ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी तालुक्यातील झरी ३३ केव्ही उपकेंद्रातंर्गत १९ गावांमध्ये गेल्या दोन-तीन महिन्यांपासून सलग १८ तास भारनियमन केले जात आहे तसेच जिंतूर तालुक्यातील आसेगाव परिसरातील वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असून बारा ते सोळा तास वीज भारनियमन होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सततच्या भारनियमनामुळे उक्त भागातील शेतक-यांना रब्बी हंगामातील पिकांना पाणी देतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून दहावी, बारावीच्या परिक्षेच्या तारखा जाहिर झाल्या असतानाही वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर दुष्परिणाम होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागात सलग १६-१८ तास भारनियमन करण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून भारनियमन कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

परभणी तालुक्यातील झरी येथील ३३/११ केव्ही उपकेंद्राअंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये तसेच जिंतुर तालुक्यातील आसेगाव परिसरातील मुबलक पाण्याच्या उपलब्धतेमुळे कृषीपंपाचा वापर वाढल्यामुळे वीज यंत्रणा अतिभारीत होत असल्याने भार व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने गेल्या दोन - तीन महिन्यांपासून सदर गावांमध्ये १२ ते १६ तास भार नियमन करण्यात येत होते.

(२) हे खरे नाही.

परभणी तालुक्यातील झरी परिसर तसेच जिंतूर तालुक्यातील आसेगाव परिसर सिंचनाचे प्रमाण वाढल्यामुळे वीज यंत्रणा अतिभारित होत असल्याने भारनियमन करण्यात आले होते. बोरी उपकेंद्रामध्ये ५ एम. व्ही. ए. चा अतिरिक्त रोहित्र दि. २०/१२/२०१६ रोजी कार्यान्वित केल्यामुळे अतिरिक्त भारनियमन बंद करण्यात आले आहे. झरी उपकेंद्रातील रोहित्रावरील वीज भार कमी झाल्यामुळे दि. २७/०२/२०१७ पासून अतिरिक्त भारनियमन बंद करण्यात आले आहे.

(३) परभणी तालुक्यातील झरी परिसर तसेच जिंतूर तालुक्यातील आसेगाव परिसर सिंचनाचे प्रमाण वाढल्यामुळे वीज यंत्रणा अतिभारित होत असल्याने भार नियमन करण्यात आले होते.

(४) झरी येथे ५ एम.व्ही.ए क्षमतेचे अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर उभारण्याचे पायाभूत सुविधा व विकास आरखडा - २ (इन्फ्रा-२) या योजने अंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. बोरी येथे ३३/११ केव्ही उपकेंद्रामध्ये ५ एम.व्ही.ए क्षमतेचे अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर दि. २० डिसेंबर, २०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच आसेगाव परिसरासाठी वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी ११ केव्ही दुधगाव फिडर वरील अतिरीक्त भार कमी करण्यासाठी नविन ११ केव्ही विद्युत वाहिनी (लिंक लाईन) उभारणीचे काम पायाभूत सुविधा व विकास आराखडा-२ (इन्फ्रा-२) योजने अंतर्गत प्रगतीपथावर असून ७.५ किमी पैकी ६.८ किमीचे काम पूर्ण झालेले असून उर्वरित काम मार्च, २०१७ अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

-----------------

**विठ्ठल डिस्टिलरिज प्रा.लि.(जि.उस्मानाबाद) या कारखान्याने उत्पादन प्रक्रियेत लाखो रूपयांचा केलेला अपहार**

**(१९) * ७९८०५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशी मद्य बनविणाऱ्या विठ्ठल डिस्टिलरिज प्रा.लि. (जि.उस्मानाबाद) या कारखान्यात राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, उस्मानाबाद व राज्य उत्पादन शुल्क, तुळजापूर या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ८ मार्च, २०१४ रोजी छापा टाकून देशी मद्य साठयाची तपासणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोंदवही नमुना सी-एल १० प्रमाणे साठा (बॉक्स) आणि प्रत्यक्ष साठा (बॉक्स) यात मोठया प्रमाणात तफावत आढळून आली असून त्यात ७५० मि.ली.मध्ये २५६, १८० मि.ली.मध्ये २४५५, ९० मि.ली.मध्ये ११२ याप्रमाणे २८२३ बॉक्स देशी मद्य साठा कमी आढळून आला असून संबधित अधिकाऱ्यांनी २० लाख ३२ हजार ७८६ इतके उत्पादन शुल्क भरण्यास कंपनीस लेखी पत्राव्दारे कळविले होते, हे खरे आहे काय

(३) असल्यास, मात्र या कारखान्याने देशी मद्याच्या निर्मितीमध्ये कमी साठा दाखवून शासनाच्या उत्पादन शुल्कात लाखो रूपयांचा गैरव्यवहार केला असून विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारखान्याला नोटीस दिली असता सदर नोटीशीला उत्तर देतांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती देवून शासनाची फसवणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे तसेच सदर प्रकरणी संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) मे.विठ्ठल डिस्टिलरिज प्रा.लि., उस्मानाबाद या घटकाच्या सीएल-१ अनुज्ञप्तीमधील देशी मद्यसाठ्यामध्ये आढळून आलेल्या तफावतीच्या अनुषंगाने आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.१९ मार्च, २०१५ रोजी घटकास कारणे दाखवा

नोटीस बजावून सदर प्रकरणी घटकास दि.२३.९.२०१६ रोजी प्रत्यक्ष सुनावणी देण्यात आली. तथापि घटकाने सादर केलेला खुलासा समाधानाकारक नसल्याने आयुक्त, राउशु यांनी त्यांच्या दिनांक १७.१०.२०१६ च्या आदेशान्वये घटकाची सीएल-१ अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्यात आली. याबाबत घटकाने शासनाकडे पुनरिक्षण अर्जाद्वारे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने दि.१०.१.२०१७ च्या अंतरिम आदेशाद्वारे घटकाची अनुज्ञप्ती पुन:स्थापित करून घटकास चुकविलेले उत्पादन शुल्क भरण्याचे आदेशित केले आहे. तसेच अपीलकाराविरुध्द विभागाने दाखल केलेल्या गुन्हयासंदर्भात न्यायालयीन प्रक्रीया सुरु ठेवण्याचे आदेश दिले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील प्रज्ञा सेवाभावी संस्थेने कागदोपत्री खोटी माहिती देऊन अनुदानात गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२०) * ७७६०४ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार प्रकल्पासाठीच्या न्युक्लिअस बजेटच्या अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली औरंगाबाद येथील प्रज्ञा सेवाभावी संस्थेने कागदोपत्री खोटी माहिती देऊन शासनाच्या अनुदानात गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील आदिवासी विद्यार्थ्यांना एक महिन्याचे प्रशिक्षण देऊन तीन महिन्यांचे प्रशिक्षण दाखविल्याची बाब दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन अधिक चौकशी करणार आहे काय, तसेच सदर चौकशीत दोषी आढळणाऱ्या संस्थाचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर प्रशिक्षण दिनांक १७/०१/२०१५ ते १७/०४/२०१५ असे एकूण तीन महिन्यात देण्यात आलेले आहे. प्रशिक्षण काळात तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांनी भेट देऊन संस्थेने दिलेल्या प्रशिक्षणाची माहिती घेतली आहे. त्यामुळे यामध्ये गैरव्यवहार झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विभागाच्या तत्कालीन आयुक्तांनी वित्तीय मान्यता न घेता नाईट ड्रेसच्या खरेदीचे आदेश दिल्याबाबत

**(२१) * ७५८९०  श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या तत्कालीन आयुक्तांनी शासनाकडून खर्चाची वित्तीय मान्यता न घेता पुण्यातील श्री. महालक्ष्मी ड्रेसेस अँड टेलरिंग फर्मकडून नाईट ड्रेस खरेदीचे आदेश दिल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-निविदा न काढताच ठेकेदाराची नेमणूक करुन २२ कोटी रुपयांचे देयक अदा करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्तांना ५० लक्ष खरेदीचे अधिकार असतानाही २२ कोटी रुपयांची खरेदी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) निविदा काढून खरेदी करण्यास शासनाने दि. ३०.०७.२०१४ रोजी मान्यता दिली आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता शासकिय आश्रमशाळेतील मुला मुलींना नाईट ड्रेस पुरविण्याची अंदाजीत रू.२२.१६ कोटी इतक्या रकमेची खरेदी ई निवीदा प्रक्रीया राबवून करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) शासन मान्यतेने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. तथापि निविदेनंतर शासनाची मान्यता घेतलेली नसल्याने सदर विषया बद्दल प्राथमिक चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त,नाशिक यांना शासन पत्र दि. ६/२/२०१७ अन्वये कळविण्यात आले आहे. सदर चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

**मौजे गुळवंच, मुसळगाव व माळेगाव (ता.सिन्नर,जि.नाशिक) येथील औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित केलेल्या जमिनीमधून बागायती क्षेत्र वगळण्याबाबत**

**(२२) * ७८६३५ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुळवंच, मौजे मुसळगाव व मौजे माळेगाव (ता.सिन्नर,जि.नाशिक) येथे औद्योगिक वापराकरिता संपादित केलेल्या क्षेत्रामधून बागायती क्षेत्र वगळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ डिसेंबर २०१६ रोजी वा त्या सुमारास मा. उद्योगमंत्री यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अति. सिन्नर औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. १ करीता मौजे गुळवंच व मुसळगांव येथील अधिसूचित १५०५.७० हे.आर क्षेत्रामधील १३९.८६ हे.आर क्षेत्र दि.११.७.२००९ रोजी विनाअधिसूचित केले आहे. तसेच ६३.०३ हे.आर बागायती क्षेत्र विनाअधिसूचित करण्यात येत आहे. उर्वरीत १२७ हे.आर क्षेत्र महामंडळाच्या धोरणानुसार भूपिडीतांना परतावा क्षेत्र वाटप करण्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे सदर क्षेत्र विनाअधिसूचित करणे शक्य नसल्याने संपादन करण्यात येत आहे.

सिन्नर माळेगाव येथील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र संपादन करण्याकरीता १५६.५५५ हे.आर क्षेत्र दि.१०.६.२०१६ रोजी अधिसूचित करण्यात आले आहे. या क्षेत्राची संयुक्त मोजणीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर भूसंपादनाबाबत निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## राज्यात आदिवासी बहुल क्षेत्रासाठी 'पेसा' कायदा लागू करण्याबाबत

**(२३) * ७७८९३ श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने दि.२.१२.१९८५ च्या आदेशान्वये आदिवासी बहुल क्षेत्रासाठी 'पेसा' कायदा लागू केला व त्याअनुषंगाने सन १९९६ पासून राज्यात सदर कायद्याची अंमलबजावणी सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासी उपयोजनांतर्गत ज्या गावात ५०% पेक्षा जास्त आदिवासी आहे अशा ग्रामपंचायतींचा पेसा कायद्याअंतर्गत समावेश करण्यात यावा असे निवेदन माहे एप्रिल, २०१६ , डिसेंबर, २०१६ व जानेवारी, २०१७ मध्ये शासनाकडे देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, साक्री (जि.धुळे) तालुक्यातील २७ ग्रामपंचायतींची आदिवासी लोकसंख्या ६० टक्के पेक्षा जास्त असूनही त्या ग्रामपंचायतींचा सदर कायद्यात समावेश करण्यासाठी शासनाकडून प्रस्ताव तयार करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा ग्रामपंचायतींना आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येणारे ५% अनुदान दिले जात नसून शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार सदर ग्रामपंचायतींचा पेसा कायद्यात समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.

केंद्र शासनाचा पंचायतीसबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ (पेसा अधिनियम) दि. २०.१२.१९९६ रोजी अधिनियमित करण्यात आला आहे. सदर अधिनियम राज्यातील अनुसूचित क्षेत्रांना लागू आहे.

(२) होय.

(३) सन २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील गावांपासून नव्याने निर्माण झालेल्या गावांचा तसेच आदिवासी लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त असलेल्या व आदिवासी उपयोजना क्षेत्रास भौगोलिक दृष्टया संलग्न असलेल्या गावांचा अनुसूचित क्षेत्रात समावेश करण्यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्याचे काम आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या स्तरावर अंतिम टप्प्यात आहे. सदर प्रस्तावामध्ये साक्री (जि. धुळे) तालुक्यातील एकूण ४४ गावांचा समावेश विचाराधिन आहे.

(४) व (५) पेसा ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजनेंतर्गत फक्त अनुसूचित क्षेत्रातील गावे/पाडे/वस्त्या यांना देण्यांत येतो.

उक्त गावांचा अनुसूचित क्षेत्रात समावेश करण्यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झाल्यावर केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) येथील देहरे आश्रमशाळेतील**
**मुख्याध्यापकांनी केलेला गैरव्यवहार**

**(२४) * ७६३३२ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि. पालघर) येथे आदिवासी विकास प्रकल्पातील देहेरे आश्रमशाळेत मुलांना खेळण्यासाठी सुसज्ज मैदान मिळावे या उद्देशाने शाळेतील मैदानाच्या सपाटीकरणाचा प्रस्ताव जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यांनी मंजूर करुन दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी या कामासाठी ७ लाख ५० हजार रुपयांची मंजूरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेच्या मुख्याध्यापकांनी एका संस्थेशी संगनमत करुन मैदानाचे सपाटीकरण न करताच ५ लाख २५ हजार रुपये खात्यातून परस्पर रक्कम काढून गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार गैरव्यवहार करणा-या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, देहरे यांचेस्तरावरून आश्रमशाळेकरिता मैदानाचे सपाटीकरण करणे या कामाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरिता जिल्हा क्रिडा अधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास त्यांनी दि.२/९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करून सदर कामाचा निधी मुख्याध्यापक यांचे खातेवर परस्पर वितरीत केला आहे. मैदानाचे सपाटीकरणाचे काम पूर्ण झालेले नसतानाही मुख्याध्यापकाने संबंधित ठेकेदाराला निधी वर्ग केला आहे. त्यानुषंगाने प्रकल्प अधिकारी, जव्हार यांनी दि.६/१/२०१७ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून मुख्याध्यापकाचा खुलासा घेवून त्यांची सविस्तर चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या प्रकाशगड कार्यालयातील मुख्य महाव्यवस्थापकांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(२५) * ७५३४८ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या प्रकाशगड कार्यालयातील मानव संसाधन विभागात मुख्य महाव्यवस्थापक पदावर कार्यरत असलेले श्री.संदेश हाके यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी श्री.राकेश जाधव यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.उर्जा मंत्री, महावितरण कंपनीचे संचालक यांचेकडे लेखी तक्रार करुन चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीमध्ये श्री.हाके यांनी महावितरण कंपनीची दिशाभूल करुन १६ वेळा वार्षिक वेतन वाढीचा लाभ घेणे, सेवापुस्तकाला जोडलेल्या दाखल्यात खाडाखोड करुन जन्मतारखेतही बदल करणे, कर्मचारी भरतीत नियमांचे उल्लंघन करुन भरती प्रक्रिया राबविणे बाबी नमुद करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीनुसार श्री.सचिन ढोले, कार्यकारी संचालक, मानव संसाधन विभाग यांनी चौकशी करुन अहवाल वरिष्ठ अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक यांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालामध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या आहेत तसेच उक्त तक्रार अर्जात नमूद केलेल्या सर्व बाबींचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(५) तसेच तपासात आढळलेल्या निष्कर्षानुसार शासनाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) उपरोक्त तक्रारीसंदर्भात केलेल्या चौकशीच्या अहवालामध्ये वेतन निश्चिती, सेवापुस्तकामध्ये नोंदवलेली जन्म तारीख व शाळांच्या दाखल्यांमधील जन्म तारीख तसेच जन्म तारखेमध्ये खाडाखोड, तांत्रिक संवर्गातील विद्युत सहाय्यक व सरळसेवा संवर्गातील भरती प्रक्रिया, खेळाडू कोटयातील नियुक्ती, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) या पदावरील नियुक्ती, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) यांच्या प्रशासकीय कामकाजाबाबत या बाबीसंदर्भात चौकशी करण्यात आली आहे.

उक्त तक्रारीमधील उच्च वेतनश्रेणीच्या लाभाबाबत या बाबीसंदर्भात प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

(५) सदर तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले नसल्यामुळे संबंधितांवर कारवाई केलेली नाही.

-----------------

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने भिवंडीमध्ये छापा टाकून क्लोरल हायड्रेट चा साठा जप्त केल्याबाबत

**(२६) * ७६५५२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मुंबई येथील भरारी पथकाने भिवंडीमध्ये छापा टाकून सुमारे १५ लाख ६७ हजार ५०० रूपयांच्या किंमतीचा क्लोरल हायड्रेट या विषारी पावडरचा साठा जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताडीचे सेवन करणारी व्यक्ती संपूर्णपणे नशेच्या आहारी जावी याकरिता ही विषारी पावडर ताडीमध्ये मिसळली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विषारी पावडरमुळे ताडी अधिक विषारी व जीवघेणी ठरत असल्याने शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) या गुन्हयात सात आरोपी असल्याचे निष्पन्न झाले असून आरोपींविरुध्द विष कायदा, १९१९ चे कलम २ व ६, महाराष्ट्र विष नियमावली १९७२ चे नियम ३ व १२ चे उल्लंघन झाल्यामुळे आणि महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ८१, ८३, ८६ व ९० अन्वये गुन्हा रजि. क्र.५११/१६ दि.३१.१२.२०१६ रोजी नोंद केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धानोरा-बोधगव्हान (जि.यवतमाळ) येथील निवासी आश्रमशाळेत बोगस विद्यार्थी पटसंख्या दाखवून धान्याचा करण्यात आलेला अपहार

**(२७) * ७९१३७ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील धानोरा-बोधगव्हान अनु.जाती निवासी आश्रमशाळा मध्ये बोगस विद्यार्थी पटसंख्या दाखवून धान्याचा अपहार झाल्याचे व सदर धान्यसाठा एका दुकानामध्ये विकण्यासाठी नेत असताना तहसिल कार्यालय, पुरवठा विभाग, यवतमाळ यांनी दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६ रोजी जप्त केला असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय, सदर प्रकरणी तहसील कार्यालय, यवतमाळ येथील पुरवठा विभागाकडून चौकशी करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी दोषींविरुद्ध जिवनावश्यक कायदा,१९५५ चे कलम ३,७ अनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थांना शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(२८) * ८००४३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबई, नागपूर, लातूर, औरंगाबाद, पुणे व नाशिक ह्या पाच विभागात अनूसुचीत जाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती तसेच इतर मागासवर्गीय ३ लाख ३८ हजार विद्यार्थी सन २०१५ - १६ या शैक्षणिक वर्षात १४ डिसेंबर २०१६ पर्यंत शिष्यवृत्ती पासून वंचीत असून सन २०१६ -१७ या वर्षात दिनांक १४ डिसेंबर, २०१६ अखेर १२ लाख ७३४ नोंदणी केलेल्या विद्यार्थांपैकी केवळ २३ हजार ९५९ विद्यार्थांना शिष्यवृत्ती देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली असून केंद्र सरकारकडून शिष्यवृत्त्तीची रक्कम मिळाली पण अधिकाऱ्याच्या दूर्लक्षामुळे सदर शिष्यवृत्त्तीची रक्कम परत गेल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत, मा.विरोधी पक्षनेते विधानसभा यांनी मा.समाज कल्याण मंत्री यांना दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या दरम्यान पत्र पाठवून याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषी आढळलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) तसेच अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना त्वरीत शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे,

(५) शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येत आहे.

-----------------

## डहाणू तालुक्यात (जि.पालघर) कर्नाटक, मद्रास, चेन्नई व बेंगळुरूहून येणा-या काळया गुळाची खाद्य गुळाच्या नावाखाली बेकायदेशीर विक्री सुरू असल्याबाबत

**(२९) * ७८३७० श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यात (जि.पालघर) कर्नाटक, मद्रास, चेन्नई व बेंगळुरूहून येणा-या काळया गुळाची खाद्य गुळाच्या नावाखाली खुलेआम बेकायदेशीर विक्री सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई टाळण्याकरिता सदर काळा गुळ राज्यात उत्पादित झाल्याचे व कृषी उत्पन्न बाजार समितीची बोगस पावती दाखवून विभागाची दिशाभूल करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डहाणू शहरात काळा गूळ तसेच नवसागराची विक्री करणारे ८ ते १० मोठे घाउक व्यापारी असून हे व्यापारी काळा गूळ व नवसागर पालघर जिल्ह्यातील आदिवासी बहुल पाडयातील किराणा दुकानात विक्री करतात, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू गुळापासून हातभट्टीच्या दारुची प्रचंड निर्मिती होत असून त्यामुळे हजारो आदिवासी तरुण व्यसनाधीन होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करून सदरहू काळा गुळ जप्त करून संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) एप्रिल २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत पालघर जिल्हयातील हातभट्टी निर्मितीच्या ठिकाणी धाडी टाकून त्यामध्ये १५८० कि.ग्रॅम काळा गुळ व २५ कि.ग्रॅम नवसागर जप्त करण्यात आलेला आहे.

(२) काळया गुळाची वाहतुक करणारी वाहने तपासताना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पावत्या दाखवून दिशाभूल करण्याचा रत्नागिरी, कोल्हापूर या जिल्हयात प्रयत्न केल्याचे दिसून आलेले आहे.

(३) ही बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, हातभट्टी निर्मितीच्या ठिकाणी काळा गुळ आढळून आलेला आहे.

(४) हे खरे नाही.

(५) अशी बाब निदर्शनास आल्यास वेळीच कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## मराठवाड्यात कृषीमाल प्रक्रिया केंद्रे उभारण्याबाबत

**(३०) * ७४१३१ श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मराठवाड्यात उत्पादीत होणाऱ्या कृषी मालावर प्रक्रिया करण्यासाठी ९ ठिकाणी प्रक्रिया उद्योग केंद्रे सुरु करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी औरंगाबाद येथे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार जाहिर केलेली ९ ठकिाणे कोणती आहेत,

(३) तसेच या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

शासनाने मराठवाड्यात उत्पादित होणाऱ्या कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या सुक्ष्म व लघु उपक्रमांची क्षमतावृद्धी होण्यासाठी, त्यांच्या उत्पादकता वाढीसाठी व त्यांना स्पर्धात्मक बनविण्यासाठी औद्योगिक समूह तयार करून अशा समूहास सहाय करण्याविषयी निर्णय घेतला आहे.

(२) सदर निर्णयानुसार मराठवाडा विभागातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर या आठ जिल्ह्यामध्ये कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या सुक्ष्म व लघु उपक्रमांचे औद्योगिक समूह विकसित करण्यात येणार आहेत.

(३) व (४) सदर निर्णयानुसार मराठवाडा विभागातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हानिहाय किमान एक कृषी मालावर प्रक्रिया करणारे सुक्ष्म व लघु उपक्रमांचे औद्योगिक समूह निश्चित करून औद्योगिक समूह प्रकल्पांचा प्राथमिक अहवाल / निदानोपयोगी अभ्यास अहवाल राज्यस्तरीय समितीच्या मंजूरीसाठी सादर करणेबाबतची कार्यवाही संबंधीत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र व उद्योग सह संचालक, औरंगाबाद विभाग यांचेकडून करण्यात येत आहे.

-----------------

## तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत विकास कामांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३१) * ८०५०७ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील तुमसर व मोहाडी तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागात ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत विकास कामांचे प्रस्ताव अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचेकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) सदरहू प्रस्तावास मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

सन २०१६-१७ मध्ये जिल्हा नियोजन समितीने ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजने अंतर्गत भंडारा जिल्ह्यातील एकूण १० कामांना मान्यता दिली आहे. त्यामध्ये मोहाडी व तुमसर तालुक्यातील कामांचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इगतपुरी (जि. नाशिक) येथील आदिवासी क्रीडा प्रबोधिनीतील असुविधांबाबत

**(३२) * ७४२५३ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि. नाशिक) येथे आदिवासी विकास विभागामार्फत उभारण्यात आलेल्या आदिवासी क्रिडा प्रबोधिनीमध्ये सुविधांचा अभाव असल्याचे तसेच प्रबोधिनीतील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, प्रशिक्षण, उपचार, योग्य आहार वेळेवर उपलब्ध होत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबींची शासनाने दखल घेऊन क्रिडा प्रबोधिनीमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा व सवलती उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच याबाबत विलंब करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना क्रीडा विषयक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता इगतपुरी (जि.नाशिक) येथे क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याबाबत दि.२४.०८.२००९ रोजी शासन निर्णय घेण्यात आला होता. परंतु सदर ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी कार्यान्वित न झाल्याने ऑगस्ट, २०१५ पासून क्रीडा विभागाच्या विभागीय क्रीडा संकुल, नाशिक येथे तात्पुरत्या स्वरूपात सदर क्रीडा प्रबोधिनीचे कामकाज सुरू करण्यात आले आहे.

प्रस्तुत क्रीडा प्रबोधिनीत प्रवेशित सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींना नियमित क्रीडा प्रशिक्षण दिले जाते तसेच क्रीडा विभागाच्या धर्तीवर निश्चित करून दिल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना आहार देण्यात येतो. सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य, निवास सुविधा, वैद्यकीय सुविधा तसेच शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील आश्रमशाळांनी विद्यार्थ्यांच्या साहित्य निविदा प्रक्रियेत केलेला गैरव्यवहार

**(३३) * ७४१४६ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी),**

**श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाकडून आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी सन २०१६-२०१७ या वर्षासाठी टूथपेस्ट, साबण, तेलखरेदी आदींसाठी निविदा काढण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये ठाणे जिल्हयातील १२० आश्रमशाळांना टूथपेस्टचा पुरवठा करण्यासाठी सुमारे ११ कोटी रूपयांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या व त्यामध्ये ३ संस्थांनी निविदा भरल्या होत्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी आयुक्त व संबंधित अधिका-यांनी संगनमताने ज्या संस्थेने नमुना सादर केला नव्हता त्यांची निवड केली असून ज्या संस्थेने टुथपेस्टचा पुरवठा केला त्यामध्ये बाजार भाव व खरेदीमध्ये तफावत आढळून आली असल्यामुळे दक्षल कंपनीने सदरहू गैरव्यवहाराबाबत सखोल चौकशी करण्यात यावी म्हणून मुख्यमंऱ्याकडे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) शासन निर्णय १०/०३/२०१६ मधील तरतुदीनुसार शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आंघोळीचा साबण, कपडे धुण्याचा साबण, भांडी धुण्याचा साबण, खोबरेल तेल, टुथपेस्ट, टुथब्रश, सॅनिटरी नॅपकिन पुरविणेसाठी अपर आयुक्त, ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर यांचे स्तरावरुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

(२), (३), (४), (५) व (६) अपर आयुक्त, ठाणे यांनी त्यांचे अंतर्गत १२० शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना वरील वस्तू पुरविण्यासाठी अंदाजे ११.६३ कोटी इतक्या रकमेची ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. प्रकरणी एकूण १० निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी कागदपत्रे तपासणीत ९ निविदाधारक पात्र ठरले. त्यापैकी टुथपेस्ट पुरवठ्यासाठी ८ पुरवठादारांनी दर नमूद केले होते.

सदर निविदेमध्ये सर्वात कमी दर (L-१) हे आदिम आदिवासी स्वयंरोजगार सह. संस्था मर्या. घोडेगांव यांचे असून त्यांनी प्रॉमीस टुथपेस्ट(१०० ग्रॅम) साठी रु. २२.९० दर नमूद केला होता. तदनंतर दक्षल कॉस्मेटीकने (L-२) पर्ल व्हाईट टुथपेस्ट (१०० ग्रॅम) साठी रु. २३ दर नमूद केला होता. तथापि आदिम आदिवासी स्वयंरोजगार सह. संस्थेने प्रॉमिस टूथपेस्टचे नमूने प्रयोगशाळेत तपासणीसाठी सादर केलेले नव्हते. मात्र आदिवासी विकास विभागांतर्गत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांनी मागविलेल्या निविदेमध्ये प्रॉमिस टुथपेस्टसाठी तपासणी मध्ये पात्र ठरलेला अहवाल विभागास प्राप्त झाला होता. प्रॉमिस टुथपेस्ट ही नामांकित (ब्रँडेड) असून तिचे दर अन्य टुथपेस्ट कंपन्यापेक्षा कमी होते. त्यामुळे राज्यस्तरावर सर्वच आश्रमशाळांसाठी एकाच ब्रँडचा विचार करुन प्रॉमिस ह्या टुथपेस्टचा ब्रॅड निश्चित करण्यात आला आहे. अपर आयुक्त, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील शाळांमधील विदयार्थ्यांसाठी टुथपेस्ट खरेदीची अंदाजित रक्कम रु. १२८.४९ लक्ष इतकी आहे.

दक्षल कंपनीने गैरव्यवहाराची चौकशीची मागणी केलेली होती परंतु वरीलप्रमाणे नियमानुसार कार्यवाही केली असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. मात्र या प्रकरणी टुथपेस्ट पुरवठयाबाबत प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये टुथपेस्ट पुरवठयासंदर्भात न्युनतम दराच्या पुरवठादारास टूथपेस्टचा पुरवठा आदेश देण्यात आलेले नाहीत.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय सहकारी संस्थांनी शासनाकडून कर्ज घेऊनही उद्योग सुरू न केल्याबाबत

**(३४) * ७७०७० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३७२ मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थांना सन २००४ पासून आतापर्यंत ११०० कोटी कर्जाचे वाटप करण्यात आले असून १० वर्षात केवळ ६० संस्थांनी उद्योग सुरू केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात उद्योग सुरू न केलेल्या ३१२ संस्थांना शासनाने एकूण किती  निधी कर्ज स्वरूपात वितरीत केला आहे तसेच अन्य कोणत्या सवलती देण्यात आल्या आहेत काय,
(३) असल्यास, १० वर्षात शासनाचे कर्ज व अन्य सवलतीचा लाभ घेवूनही उद्योग सुरू न करणा-या ३१२ संस्थांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४)  नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१)  होय. अंशत: खरे आहे.
(२)  राज्यातील मागासवर्गीय सहकारी संस्थांपैकी उद्योग सुरू न केलेल्या २९९ संस्थांना शासकिय भागभांडवल रूपये ३७९.०० कोटी व शासकिय कर्ज रूपये ३९९.३३ कोटी अर्थसहाय्य मंजूर केले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांतर्गत संस्थेची नोदणी झाली असल्यास प्रकल्पाच्या जमीन खरेदीसाठी नोंदणी शुल्क व मुद्रांक शुल्क आकारले जात नाही.
(३) व (४) ३७२ मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थांपैकी ७३ संस्थांमध्ये उत्पादन सुरु झाले असून २९९ संस्थांमध्ये अद्यापही उत्पादन सुरू झालेले नाही. त्यापैकी ११४ संस्थांना अर्थसहाय्य मंजुर केलेले आहे, परंतु संस्थांनी अद्यापही उचल घेतलेली नाही. तसेच १८५ संस्थांच्या बाबतीत कारवाई सुरू / प्रस्तावित आहे.

-----------------

## नाशिक शहरातील "श्री गणेश सहकारी बँकेत" झालेला अपहार

**(३५) * ७४८५७  श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील "श्री गणेश सहकारी बँकेत" शाखा व्यवस्थापक आणि कर्मचा-यांनी बनावट कर्ज प्रकरणाच्या आधारे ६ कोटी ७ लाख रूपयांचा अपहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी २४ जणांविरुध्द सरकारवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, सदर चौकशीअंती दोषी असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

श्री गणेश सहकारी बँक लि. नाशिक या बँकेचे सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या दोन वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये बँकेमध्ये अफरातफर, बनावट कर्ज प्रकरणे, अपहार, शाखा जुळवणी अफरातफर तसेच इतर गंभार बाबी निदर्शनास आल्या. त्यामुळे संबधीत सनदी लेखापाल यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक यांना सादर केलेल्या विशेष अहवालामध्ये संबंधीतांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागितली. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक ६.२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली. त्यानुसार संबंधीत सनदी लेखापाल यांनी दिनांक २०.२.२०१५ रोजी सरकारवाडा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने दिनांक ४.१.२०१७ रोजी गुन्हा क्र. ०३/२०१७ अन्वये बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसह १२ कर्मचारी व बँकेचे संचालक मंडळ यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोडेगांव (ता. आंबेगांव, जि. पुणे) येथील आदिवासी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षक नसल्याबाबत

**(३६) * ७६९०१ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगांव तालुक्यातील घोडेगांव (जि. पुणे) येथील आदिवासी विभागाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इंग्रजी माध्यमाचेच शिक्षक नसल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षणापासून वंचित रहावे लागत असून यासंदर्भात स्थानिक

लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जानेवारी, २०१७ रोजी मा.आदिवासी विकास मंत्र्यांकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी विद्‌यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचा शिक्षक देण्याबाबत स्थानिक प्रकल्प अधिकारी, पुणे यांच्याकडेही माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक प्रकल्प अधिकाऱ्यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.८/०१/२०१७ च्या पत्रान्वये मा. मंत्री, आदिवासी विकास यांचेकडे दिलेले निवेदन दि.३१/०१/२०१७ रोजी प्राप्त झाले आहे.

शिक्षकांची पदभरती करण्याबाबतचे नियुक्ती प्राधिकारी अपर आयुक्त, आदिवासी विकास हे असल्यामुळे अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांना याबाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही

(३) व (४) शिक्षक संवर्गाच्या पदभरती संदर्भातील नियुक्ती प्राधिकारी अपर आयुक्त, आदिवासी विकास हे आहेत. त्यामुळे याबाबत प्रकल्प अधिकारी स्तरावर कार्यवाही अपेक्षित नाही.

-----------------

**मोखाडा तालुक्यात (जि.पालघर) असलेल्या वीजेच्या समस्यांबाबत**

**(३७) * ७९७२५ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा तालुक्यात (जि.पालघर) विजेची गंभीर समस्या निर्माण झाली असून या भागात सतत विज नसणे तसेच मिटरचे रीडींग न घेता देयके आकारणे, वेळेवर ग्राहकांना देयके न देणे तसेच बाजारपेठेत वीज देयके भरणा केंद्र नसल्याने ग्राहकांची गैरसोय होत असल्याच्या अनेक तक्रारी स्थानिक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मोखाडा तालुक्यात ९ हजाराहून अधिक वीज मीटर ग्राहकांना वीजेच्या या असुविधेबाबत महावितरणकडे अनेकवेळा तक्रारी करुनही महावितरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येऊन नागरिकांना असमाधानकारक उत्तरे देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

पालघर जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील ३३/२२ केव्ही उपकेंद्रास डहाणू येथील १३२ केव्ही उपकेंद्रातून ७८ किमी लांब असलेल्या उच्चदाब वाहिनीव्दारे पुरवठा करण्यात येतो. सदर वाहिनीची देखभाल व दुरुस्तीचे काम माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये करण्यात आलेले असून माहे नोव्हेंबर - २०१६ मध्ये पायाभूत आराखडा - २ या योजनेअंतर्गत नवीन ३३ केव्ही वीजवाहिनी कार्यान्वित केल्यामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी झाले आहे. सद्यस्थितीत सदर वाहिनीवर वीज पुरवठा खंडीत होण्याची कोणतीही तक्रार नाही

सद्य:स्थितीत मीटर वाचनाच्या कामासाठी मे. शिवकृपा एंटरप्रायजेस यांना माहे डिसे. २०१६ पासून वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. मोखाडा तालुक्यातील ग्राहकांना वीज देयके भरणे सुलभ व सोईस्कर होण्याकरिता एक नवीन वीजबिल भरणा केंद्र जव्हार अर्बन बँक, मोखाडा येथे माहे फेब्रुवारी २०१७ पासून कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यामुळे या परिसरातील ग्राहकांना वीजबिल भरण्याबाबत सुविधा उपलब्ध झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## गडचिरोली येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे माना जमातीची ७ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३८) * ७५८८७ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली यांच्या

कार्यालयाकडे सन २०१०-११ पासून संपूर्ण 'माना' जमातीतील सुमारे ७ हजार जात प्रमाणपत्र तपासणी प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत माहे डिसेंबर २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास मोर्चा काढण्यात येऊन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. राज्यपाल महोदयांना तथा मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रमाणपत्राअभावी 'माना' जमातीतील मुलांना उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश व नोकरी मिळण्यास अडचणी येत असून शासनाने जात प्रमाणपत्र तपासणी तातडीने होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) नाही. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली यांचेकडील माहे डिसेंबर, २०१६ अखेरीस प्रलंबित प्रकरणांपैकी माना अनुसूचित जमातीची एकूण २०४३ प्रकरणे प्रलंबित असून त्यातील १९५५ प्रकरणे पोलीस दक्षता पथकाकडे शालेय व गृह चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

(२) होय.

(३) शासनाने अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज संपूर्णपणे ऑनलाईन केले असून दिनांक १.५.२०१६ पासून आदि प्रमाण प्रणाली ही संगणकीकृत कार्यप्रणाली कार्यान्वित केलेली आहे.

तसेच आदिवासी व्यक्तींना अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र देणे ही सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित केली आहे.

गडचिरोली समितीमधील पोलीस दक्षता पथकातील पोलीस उप अधिक्षक आणि पोलीस निरीक्षक ही रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कोळपेवाडी (ता. कोपरगाव, जि.अहमदनगर) येथील नवीन १३२ के.व्ही. वीज उपकेंद्राला मंजुरी देणेबाबत

**(३९) * ७८६४५ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोळपेवाडी (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) परिसरातील वीज समस्येवर कायमची उपाययोजना करण्यासाठी येथे नवीन १३२ के.व्ही. वीज उपकेंद्र होण्याकरिता माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.उर्जा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीकडून यासंबंधीचा प्रस्ताव महापारेषण कंपनीस प्राप्त झालेला नाही.

(२) याबाबत दि. २०.०६.२०१६ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) कोळपेवाडी परिसरास २२० के.व्ही. कोपरगाव उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो. २२० के.व्ही. कोपरगाव उपकेंद्रातील स्थापीत क्षमता १०० (२ X ५०) एम.व्ही.ए. असून त्यावर एकूण फक्त ६९ एम.व्ही.ए. उच्चत्तम भाराची नोंद आहे. म्हणजेच उपकेंद्र कमीभारीत (Underloaded) असून उपकेंद्रात क्षमता शिल्लक आहे. तसेच कोळपेवाडी ते कोपरगाव हे अंतर अंदाजे फक्त १० कि.मी. एवढेच आहे. त्यामुळे कोळपेवाडी येथे वेगळया उपकेंद्राची सध्यातरी आवश्यकता नाही. परंतु कोळपेवाडी येथे नवीन उपकेंद्रासाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रणाली अभ्यासाच्या आधारे त्याची सुसाध्यता तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हयामध्ये संत रोहीदास चर्मोद्योग महामंडळाकडून कर्जवाटपात झालेल्या अपहाराबाबत**

**(४०) * ७४२५४ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमत करुन जमिनीच्या ७/१२ व शिधापत्रिकेच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे २५० प्रकरणामध्ये कर्ज मंजूर करुन लाखो रूपयांचा अपहार केल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणात जिजाबाई वाघ या महिलेने सन २०११ मध्ये सदरहू महामंडळाकडून २५ हजार रुपयांच्या घेतलेल्या कर्जसाठी तारण म्हणून श्री. विठ्ठल रामदास कचरे (रा. डोळासणे,ता.संगमनेर) ह्या शेतकऱ्याच्या जमिनीचा ७/१२ उतारा व शिधापत्रिकेच्या बनावट प्रती जोडल्याचे श्री. कचरे यांनी केलेल्या माहितीच्या अधिकारातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याप्रकरणांची चौकशी करण्याची मागणी काही सामाजिक संस्थांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास,चौकशीअंती दोषी असलेल्या संबंधित अधिकारी,कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही,

तथापि नाशिक येथील एका प्रकरणाबाबत जामिनदाराकडून तक्रार प्राप्त झाल्याने त्याबाबत चौकशी करून शहानिशा करण्यात येत आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) जामीनदार श्री विठ्ठल कचरे यांनी लाभार्थी श्रीमती जिजा संजय वाघ श्री. राजेद्र समशेर, व्हेडर श्री.विजय बी.चंद्रात्रेय व महामंडळाच्या नाशिक येथील तत्कालीन जिल्हा कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेवर गु.र.नं. ३३०/१६

दिनांक २२.१२.२०१६ नूसार मुंबई नाका पोलिस स्टेशन,नाशिक शहर येथे तक्रार दाखल केली आहे.

त्यामूळे महामंडळातील श्री. शि.रा. सांगळे, सेवानिवृत्त विभागीय अधिकारी, नाशिक, श्री. सी.डी. जोशी विभागीय अधिकारी कोकण तथा तत्कालीन जिल्हा व्यवस्थापक नाशिक व श्री. प्र.ना.तायडे सेवानिवृता वसूली निरीक्षक यांच्या कडून सदर प्रकरणाबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे.

-----------------

## नागपूर जिल्हयातील तुली माध्यमिक शाळेच्या वसतिगृहातील आचाऱ्याने आदिवासी मुलींवर अत्याचार केल्याबाबत

**(४१) * ७५०९१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील कोराडी-बोखारा मार्गावर असलेल्या तुली माध्यमिक शाळेच्या वसतीगृहात राहणाऱ्या ५ गरीब आदिवासी विद्यार्थ्यीनीचा शाळेमध्ये काम करणाऱ्या आचाऱ्याने विनयभंग केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूरच्या आदिवासी प्रकल्पाच्या अधिकारी यांनी वसतिगृहाला दिलेल्या भेटी दरम्यान सदर प्रकार उघड झाला असून आदिवासी विद्यार्थीनीवर लैगिंक अत्याचाराची दुसरी घटना नागपूर जिल्हयात घडली असल्यामुळे मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच शिक्षणाधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा तपास व निरीक्षण करण्याकरीता पाठविलेल्या पथकांनी तुली शाळेच्या प्रशासनाकडे विचारणा केली असता त्यांनी प्रकरण दडपण्यसाठी प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या शाळेमधील विद्यार्थीनीचे पाल्य विचारपुस करण्याकरिता तेथे गेले असता शाळा आणि वसतीगृहाचे प्रशासनाने त्यांच्याशी असभ्य वागणुक केली असून शाळेमधील विद्यार्थीनीचा विनयभंग करणाऱ्या आचाऱ्यावर व हे

प्रकरण गंभीरपणे न घेणाऱ्या प्रशासनाची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) प्रकल्प कार्यालय, नागपूर येथील कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या पथकामार्फत दि.०४.०१.२०१७ रोजी तुली पब्लीक स्कूल या शाळेस दिलेल्या भेटीत निदर्शनास आलेली नागपूर जिल्हयातील लैंगिक अत्याचाराची ही दुसरी घटना आहे, हे खरे आहे.

तथापि, प्रकरणी तात्काळ कारवाई करण्यात आलेली आहे. सबब, मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला नाही.

(३) हे खरे नाही.

(४) मुलींवर अत्याचार करणाऱ्या आपचारी विरूद्ध पोलिस स्टेशन, कोराडी येथे दि.०५.०१.२०१७ रोजी एफ.आय.आर. नोंदविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणातील आरोपी जमीर बाप्ती शहा याच्याविरूद्ध भा.द.वि. कलम ३५४ (अ), तसेच प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सस ॲक्ट, २०१२ कलम ७,८,११,१२ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून अनुसूचित जमाती प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ (१) (W) (i) (ii) अन्वये गुन्हा नोदवून त्यास अटक करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा व गोंदिया या जिल्हयातील आदिवासी विकास सहकारी संस्थांचे कमिशन नाशिक येथील महामंडळाने थकविल्याबाबत**

**(४२) * ७५८८६ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भाच्या गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया या चार जिल्हयातील जवळपास ५०० पेक्षा जास्त विविध आदिवासी विकास सहकारी संस्थांचे कमिशन नाशिक येथील महामंडळाकडून मागील ३ वर्षापासून थकित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने थकित कमिशनची रक्कम तातडीने संस्थांना मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

विदर्भातील गडचिरोली,चंद्रपूर,गोंदिया व नागपूर या जिल्हयातील १९२ संस्था या आदिवासी विकास महामंडळाच्या सभासद असून त्यापैकी २०१३-१४ मध्ये १४१ संस्था,२०१४-१५ मध्ये १२८ व २०१५-१६ मध्ये ११८ संस्थांनी ३०,५८,२४८.०० क्विंटल धान खरेदी केलेले आहे. प्रती क्विंटल २५ रु.प्रमाणे कमिशन रु.७,३३,६०,१२०/- देय होते.त्यापैकी रु.३,६५,७२,४८१/- इतकी रक्कम वेळीच अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित कमिशनची रु. ३,६७,८७,६३९/- इतकी रक्कम सदर संस्थांना देय आहे. २% पर्यंतची घट वाजवी घट मान्य करून त्यावरील अवाजवी घटीस संस्था जबाबदार राहिल याबाबतचे करार संस्थांकडून महामंडळासोबत करण्यात येतात. ज्या आदिवासी विविध कार्यकारी संस्थाकडे घटीचे प्रमाण मोठया प्रमाणावर आहे अशा संस्थांना देय असलेले खरेदी कमिशन घट /तूट वसूली पोटी समायोजित केली जाते व त्यातील उर्वरित रक्कम त्या संस्थांना दिली जाते.

परंतु या संस्थांकडे तिनही हंगामातील अवाजवी घटपोटी जवळपास रु.१०,६६,२७,७०८/- इतकी रक्कम वसूल पात्र असल्याने त्यांना कमिशनपोटी देय असलेली रक्कम समायोजित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.